म्हणाले,
ल अवैध
कारवाई
ी खबर
लमधून
सासाठी
मृत्यूचे
अहवाल

अपघाताची शक्यता आहे.

याबाबत नागरिक संगीता मंत्री म्हणाल्या, "हनुमान टेकडीवर दररोज शेकडो नागरिक फिरावयास येतात. नेमक्या याच विजेच्या खांबालगत अनेक जण दुचाकी वाहने लावतात. या खांबातून वाहणाऱ्या विजेच्या प्रवाहामुळे व्यक्तीला अपघात होऊ शकतो. तसेच वाहनांचेही मोठे नुकसान होण्याची

कोथरूड : विधी महाविद्यालय रस्त्यालगतच्या कांचन गल्लीत विजेच्या खांबावरील पेटी गेल्या दोन महिन्यांपासून उघडी व धोकादायक अवस्थेत आहे.

शक्यता असल्याने महावितरण आणि महापालिकेच्या वतीने तातडीने याची दखल घेऊन उपाययोजना केल्या पाहिजेत."

# 'आधार'विरोधात लढावे लागेल : डॉ. रामनाथन

पुणे, ता. २३ : "देशातील भ्रष्टाचार कमी होण्यासाठी आधार कार्ड उपयुक्त ठरेल, असे पटवून देत सरकार नागरिकांची वैयक्तिक माहिती मिळवत आहे. परंतु वैयक्तिक माहिती ही आपली खासगी मालमत्ता असून, ती सुरक्षित राहण्यासाठी आपल्यालाच आवाज उठवावा लागेल," असे मत कायदेतज्ज्ञ डॉ. उषा रामनाथन यांनी व्यक्त केले.

नागरिक चेतना मंचातर्फे डॉ. रामनाथन यांचे 'आधार कायदा २०१६, त्याचा नागरिकांवर परिणाम' या विषयावर गुरुवारी व्याख्यान झाले. मंचाचे मेजर जनरल (निवृत्त) एस. सी. एन. जटार, बी. डी. शर्मा उपस्थित होते.

डॉ. रामनाथन म्हणाल्या, "आधार कार्ड क्रमांक हा ओळखीचा किंवा पत्त्याचा पुरावा आहे, याची हमी कोणीच देत नाही. तरीही वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी हे कार्ड ग्राह्य धरले

**तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आजवर अनेक गोष्टी सुलभ झाल्या. मात्र, एखादे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून तंत्रज्ञानाद्वारे नागरिकांची वैयक्तिक माहिती गोळा करणे हा धोक्याचा इशारा समजावा.**

**– डॉ. उषा रामनाथन,** कायदेतज्ज्ञ

जाते. या कार्डची देशाला गरज आहे की नाही, हे अद्याप सिद्ध झालेले नाही. हा क्रमांक नसला, तरीही विविध सुविधा मिळू शकतात. नागरिकांच्या डेमोग्राफिक आणि बायोमेट्रिक माहितीत बदल झाला किंवा एखाद्याचा आधार चोरीला गेला तर कोणतीही उपाययोजना केल्याचे आढळून येत नाही." वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी सध्याचे सरकार आधार कार्डचाच 'आधार' घेत असून, त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.